महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,
शासन निर्णय, क्रमांक:मविसे १०/प्र.क्र.२१७/२०१२/आस्था-३
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई-४०० ००१.
दिनांक : १६ ऑक्टोबर, २०१२.

संदर्भ : शासन आदेश, ग्राम विकास व जल संधारण विभाग क्र.मविसे-४८१०/प्र.क्र.२०३/आस्था-२ दिनांक १२ सप्टेंबर, २०१२.

आदेश :-

सार्वजनिक सेवेच्या हितार्थ महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ मधील तरतुदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिका-यांच्या मान्यतेने आणि पदावधी पूर्ण होण्यापूर्वी बदली प्रस्तावित असलेल्या अधिका-यांच्या बाबतीत कलम ४ (४) व (५) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिका-याच्या पूर्वमान्यतेने ग्राम विकास व जलसंधारण विभागातील **श्री. सी.बी.जगधने, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती रेणापूर, जिल्हा परिषद लातूर** यांची संदर्भाधिन आदेशाच्या अनुषंगाने पुन:स्थापनेनंतर या आदेशान्वये **सहायक आयुक्त (तपासणी), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर** या अकार्यकारी रिक्त पदावर नियुक्ती करण्यात येत आहे.

२. **श्री. जगधने** यांनी त्यांच्या सदर पदाचा पदभार त्वरीत स्वीकारावा. तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक : सीडीआर १०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३०.८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

३. **श्री. जगधने** यांनी नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व पदभार स्वीकारल्याचा दिनांक शासनास कळवावा.

४. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२१०१६१६०५२०००२० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सरिता बांदेकर-देशमुख)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

विभागीय आयुक्त, औरंगाबाद/नागपूर
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
महालेखापाल- १/२ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
श्री. सी.बी.जगधने, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती रेणापूर, जिल्हा परिषद लातूर (मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. लातूर यांचेमार्फत)
मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
मा.सचिव (ग्राम विकास व पंचायत राज) यांचे स्वीय सहायक.
कार्यासन क्रमांक : आस्था – २, ग्राम विकास व जलसंधारण विभाग
निवड नस्ती (कार्यासन क्रमांक :आस्था-३) ग्राम विकास व जलसंधारण विभाग.